# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला पर्यावरणविषयक पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : 'टी. ए. आय. टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस अवॉर्ड्स्' २०२२ समारंभात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला 'एन्व्हायरॉनमेंट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' पुरस्काराने गौरविण्यात आले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे संचालक (प्रणाली) एस. के. गुप्ता आणि कार्यकारी संचालक (स्थापत्य) सी. एम. जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

यावेळी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता, संचालक (प्रणाली) सी. एम. जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य) सुयश त्रिवेदी, महाव्यवस्थापक (स्थापत्य) अजय फुलमाळी, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक (पर्यावरण) आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग हा एम. आर. टी. एस. प्रकल्प आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.